महा मेट्रो

PUNE METRO

# मेट्रो विदयुत ट्रॅक्शनची उभारणी वेगाने सुरु



**पुणे, २५ नोव्हेंबर २०१९ :** पुणे मेट्रोचे काम पीसीएमसी ते स्वारगेट( मार्गिका एक) व वनाज ते रामवाडी ( मार्गिका दोन ) मध्ये वेगाने सुरु आहे. जागोजागी मेट्रोचे खांब आणि व्हायाडक्ट उभारणीचे काम पुणेकरांना गेल्या वर्षांपासून दिसत आहे. मेट्रोचे खांब व व्हायाडक्ट चे काम जेथे पूर्ण झाले आहे अश्या ठिकाणी रेल टाकण्याचे काम वेगाने सुरु आहे. आतापर्यंत ११.४ किमी लांबीचे रेल पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिकेत बसविण्यात आली आहे व ५४० मी लांबीचे रेल वनाज ते रामवाडी या मार्गिकेत बसविण्यात आली आहे.



रेल बसविल्यावर विदयुत वाहक ट्रॅक्शन म्हणजे मेट्रो ट्रेन चालवण्यासाठी या विदयुत वाहक तारांची उभारणी (ट्रॅक्शन) केली जाते . मेट्रोचे विदयुत वाहक ( ट्रॅक्शन) उभारणी मार्गिका एक व मार्गिका दोन येथे वेगाने सुरु आहे. पुणे मेट्रोने ट्युब्यूलर पोर्ट्ल प्रकारची विदयुत ट्रॅक्शन वायरला सपोर्ट करणाऱ्या खांबचे डिझाइन प्रारित केले आहे. ट्युब्यूलर पोर्टल हे स्टॅबिलिटी (स्थिरता ) साठी उत्तम प्रकारचे स्ट्रक्ट्चर मानले जाते. एका ट्युब्यूलर पोर्टल चे वजन साधारण ९८० Kg आहे. ट्युब्यूलर पोर्टलची उंची ९ मी व रुंदी ९.१ मी आहे. पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिकेत आतापर्यंत ५५ पोर्टलची उभारणी व वनाज ते रामवाडी या मार्गिकेत २० पोर्टलची उभारणी झाली आहे. दोन पोर्ट्ल मध्ये ३०-३५ मी अंतर असते. विदयुत वाहक ट्रॅक्शन तारेला हे पोर्टल सपोर्ट करते. पुणे मेट्रो साठी २५ किलो व्होल्ट विदयुत वाहक ट्रॅक्शन सप्लाय वापरण्यात येणार आहे. तांत्रिक दृष्ट्या या प्रकारच्या विदयुत वाहक ट्रॅक्शन व पोर्टल यांना नियंत्रीत OHE (Over Head Equipment ) असे म्हणतात. विदयुत ट्रॅक्शन वायरला वीज पुरवठा करण्यासाठी वल्लभनगर व हिल व्हिव पार्क डेपो येथे इलेक्ट्रिक सबस्टेशन उभारण्याचे काम वेगाने सुरु आहे. या दोन सबस्टेशन मधून मेट्रो मार्गिकांना वीजपुरवठा करण्यात येइल. मेट्रो विदयुत ट्रॅक्शन उभारण्यात आलेल्या गतीमुळे मेट्रो कामाचा एक महत्वाच्या टप्प्याचे काम सुरु झाले आहे .

याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे कि , मेट्रो विद्युतीकरणाचे काम जागतिक दर्जाच्या निकषांद्वारे होत आहे. व मेट्रोचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठीचे एक महत्वाचे पाऊल आहे.